ई साहित्य प्रतिष्ठान

एक प्रसन्न अनुभव

पुस्तक प्रकाशन कार्यपद्धती



2026

ई साहित्य प्रतिष्ठान

आदरणीय लेखक/कवी/चित्रकार

सविनय नमस्कार

सर्वप्रथम आम्ही आपले ईसाहित्यमध्ये मनापासून स्वागत करतो. आपण ई साहित्य प्रतिष्ठानशी संपर्क केल्याबद्दल आपले शतशः आभार मानतो. आपले लेखन ईसाहित्यकडे esahity@gmail.com याच मेलवर वर्डफ़ाईल च्या स्वरूपात प्रकाशनाला पाठवावे ही विनंती करतो.

तत्पुर्वी एकदा पुढे दिलेली ई साहित्यची कार्यपद्धती वाचावी व ती मान्य असेल तरच पुढील व्यवहार करावे ही विनंती करतो.

सुनीळ सामंत
अध्यक्ष

आनंद माने
सचीव

- ई साहित्य पैसे घेत नाही. देत नाही.
- पुस्तकाच्या दर्जाबाबत मात्र कोणतीही तडजोड व चर्चा नाही. प्रकाशकांचा निर्णय अंतिम.
- लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडेच. मात्र पुस्तकाच्या ई साहित्यने प्रकाशित केलेल्या आवृत्तीचे हक्क ई साहित्यकडे.
- प्रकाशनाचा निर्णय एका आठवड्यात. प्रकाशकांचा निर्णय अंतिम. प्रकाशन निर्णयापासून ३० दिवसांच्या आत.
- पाच लाखाहून अधिक नोंदित online वाचक.
- छापिल पुस्तकाचा पर्याय. दोन हजार रुपये खर्चात शक्य.

https://youtu.be/54vJJmicvgE

ई साहित्यच्या प्रकाशनपद्धतीचा व्हिडिओ.

ई साहित्य प्रतिष्ठान ही मराठीतील आघाडीची ई बुक प्रकाशन संस्था आहे. २००८ साली स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठान तर्फे दरवर्षी दिडशे ते दोनशे निवडक दर्जेदार पुस्तके प्रकाशित होतात. अध्यात्मापासून ते कामसूत्रापर्यंत, नाटकापासून ते प्रवासवर्णनापर्यंत, संगीत, चित्रकलेपासून ते राजकारणापर्यंत, सर्व प्रकारच्या मराठी पुस्तकांचे प्रकाशन व वितरण ई साहित्य प्रतिष्ठान सर्व कायदे व नैतिक संकेत पाळून करते. ई साहित्यच्या साइटला पाचलाखाहून अधिक नोंदलेले मराठी वाचक भेट देतात व पुस्तके डाऊनलोड करतात.

ई साहित्य प्रतिष्ठान ही संस्था कवी लेखकांनी एकत्र येऊन इंटरनेटचा उपयोग करून पुस्तकं प्रसिद्ध करण्यासाठी २००८ साली स्थापन केली. हे सर्व कवी लेखक नेटवर भेटले. सर्वजण वेगवेगळ्या गांवचे, राज्यातील, देशांतील आणि वयाचे आहेत. कमी प्रसिद्ध लेखकांना एका दुष्टचक्राला तोंड द्यावे लागते. ते प्रसिद्ध नसल्यामुळे प्रकाशक त्यांचे पुस्तक करायला (आर्थिक कारणांमुळे) धजत नाहीत. त्यांचे पुस्तक प्रकाशित नसल्यामुळे ते प्रसिद्ध होत नाहीत. म्हणजे प्रकाशन नाही म्हणून प्रसिद्धी नाही आणि प्रसिद्धी नाही म्हणून प्रकाशन नाही, हे ते दुष्टचक्र.

शिवाय पुस्तक प्रकाशित न झाल्यामुळे लेखकांना आपल्या लेखनाचा कस कळणं कठीण जातं. काही प्रकाशक लेखकांकडूनच प्रकाशनासाठी पैसे मागतात.

ई साहित्य हा या दुष्टचक्रातून बाहेर पडण्याचा एक उपाय आहे. दुसरेही एक दुष्टचक्र आहे. पुस्तकांचे खरेदीदार कमी. त्यामुळे कमी प्रती छापल्या जातात. त्यामुळे छापायला नगामागे खर्च जास्त येतो. व त्यामुळे पुस्तकांच्या किंमती जास्त ठेवाव्या लागतात. व त्यामुळे खरेदीदार कमी होतात. हे ते दुसरे दुष्टचक्र. या दोन्हीही दुष्टचक्रांचा भेद करण्यासाठी ई साहित्यने ई पुस्तकांचा प्रयोग सुरू केला.

वाचकांची संख्या वाढवणे हे ई साहित्यचे सर्वात प्रमुख उद्दिष्ट आहे. आमचे पहिले उद्दिष्ट तेरा कोटी मराठी माणसांचा फ़क्त एक टक्का म्हणजे तेरा लाख नोंदित वाचकांचे आहे.

पुस्तकाचे विषय- **ई साहित्य ला प्रकाशनासाठी कोणत्याही विषयाचे वावडे नाही. उत्तम दर्जा हाच निकष आहे.** दर्जाबाबत ई साहित्यचा निर्णय अंतिम असेल. त्यावर चर्चा व तडजोड नाही.

प्रकाशनाबद्दल माहिती

आर्थिक बाबी : सध्यातरी ई साहित्य प्रतिष्ठान वाचकांकडून पैसे घेत नाही. लेखकांकडूनही पैसे घेत नाही. मात्र त्यामुळे लेखकांकडून विनामूल्य साहित्याची अपेक्षा ठेवते. लेखकांना कोणतेही मानधन देत नाही. सध्या वाचकांची संख्या वाढवण्यासाठी हे विनामूल्य वितरण करतो. मात्र इच्छा ही आहे की मराठी लेखकांना भरघोस मानधन मिळावे आणि चांगल्या लेखकांना केवळ लिखाणावर चांगल्या दर्जाचे जीवनमान उपलब्ध व्हावे. हे स्वप्न नाही. ध्येय आहे. त्यामुळे भविष्यात ई साहित्य प्रतिष्ठान आर्थिक विचार करेलच. सध्यातरी आम्ही लेखकांना पैसे देत नाही. तसेच प्रकाशन करण्याचे पैसे घेत नाही. ही संस्था पूर्णपणे नॉनकमर्शिअल आहे. सर्व कार्यकर्ते सभासद स्वतःचे पैसे खर्च करून काम करतात. एक दोनदा प्रायोगिक तत्वावर एक दोन ईपुस्तके विक्री करण्यास सुरुवात केली. ही विक्री Online असून वाचकाकडून लेखकाच्या अकाउंटमधेच पैसे ट्रान्स्फ़र होत असत. म्हणजे १००% पैसे लेखकालाच मिळत. हे केवळ प्रायोगिक होते. यातून काही अनुभव मिळाले. यांचा उपयोग भविष्यात केला जाईल. छापील पुस्तक लेखक स्वतः विक्री करू शकतात. त्याचे १०० टक्के पैसे लेखकालाच मिळतील.

a

गेली अठरा वर्षे आमची टीम एका ध्येयाने काम करत आहे. सर्वजण आपआपली नोकरी किंवा व्यवसाय सांभाळून ई पुस्तकांची निर्मिती करत असतात. यातील बहुतेकजण प्रोफ़ेशनल असून त्यांच्या त्यांच्या नोकरी व्यवसायात दिवसाला पाच ते वीस हजार रुपये कमावतात. म्हणजे त्यांच्या दिवसाच्या कामाचे मोल पाच ते वीस हजार रुपये होईल. मात्र ई साहित्यचे काम ते कोणताही मेहनताना न घेता करतात. उलट त्यासाठी होणारा सर्व खर्च ते स्वतःच्या खिशातून करतात.

हे सर्व करण्याचे कारण- मराठी लेखक केवळ छंद लिंवा ऊर्मी म्हणून लिहितात. पण काही प्रकाशक त्यांना मानधन तर देत नाहीतच, उलट काही प्रकाशक तर लेखकांकडूनच प्रकाशनाचे पैसे घेतात. शिवाय त्यानंतर ते साहित्य जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी फ़ारसे काम करताना दिसत नाहीत. लेखकांचे साहित्य जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावे आणि लेखकांना कोणर्ताही खर्च येऊ नये यासाठी आम्ही वर म्हटल्याप्रमाणे काम करतो.

आम्ही महिन्याला वीस ते पंचवीस पुस्तके प्रकाशित करतो. एका वेळी एकसमयावच्छेदेकरून आमच्याकडे सात ते आठ पुस्तकांचे वेगवेगळ्या स्तरावर काम सुरू असते.

a

वितरणाबाबत : ई-साहित्य प्रकाशनाची ई-बुक्स इलेक्ट्रौनिक स्वरुपात प्रकाशित होतात. म्हणजेच ती ओरिजिनल ई बुक्स आहेत. ती मुख्यतः PDF स्वरुपात असतात. अनेक पुस्तके epub(किंडल) असतात. प्रकाशित झाल्यानंतर ती ई मेलद्वारे व Whatsapp द्वारे लाखो वाचकांपर्यंत पोहचतात आणि व्हायरल होत त्यांचा प्रवास सुरुच राहतो; अगदी जगाच्या कानाकोपऱ्यातल्या मराठी रसिकाच्या ईन-बॉक्स पर्यंत. त्याशिवाय लक्षावधी वाचक ई साहित्यच्या वेबपोर्टलला (www.esahity.com) भेट देऊन आपले पुस्तक वाचतात. इतरही अनेक मराठी वेबपोर्टल आणि APP वरून, शाळा, कॉलेज, ग्रामपंचायती, तुरुंग यातील ई लायब्ररी मधे ई साहित्यची पुस्तकं लाखो लोकांपर्यंत जातात. ई साहित्यचे app लवकरच सुरू होईल. पुस्तके जास्तीत जास्त वाचकांनी वाचावी यासाठी यातली काही पुस्तके आम्ही ई मेल ने तसेच ब्ल्यु टुथ, पेन ड्राईव्ह, सिडी, मोबाईल ऍप, whatsapp आदी मार्गानेही वितरित करत असतो.

a

पुस्तकाच्या व लेखनाच्या **कॉपीराईटबद्दल**: ई साहित्यद्वारे प्रकाशित होणाऱ्या पुस्तकातील साहित्याचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असतात. पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट इ. रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास लेखक अशा लोकांवर कायदेशीर कारवाई करू शकतात. आपले पुस्तक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेचा पुरावा जपून ठेवावा. ईमेलची तारीख, फ़ेसबुकची तारीख हेही पुरावे ग्राह्य असतात. शक्यतो लेखकांनी आपल्याला जमेल तसा, घरच्या घरी किंवा एखाद्या हॉलमध्ये, किंवा Online पुस्तक प्रकाशनाचा सोहळा करावा. व त्याचे फ़ोटो व बातमी ई साहित्यकडे आणि पत्रकारांकडे पाठवावी. बातमी छापली नाही तरी हे पत्र आणि फ़ोटो हा पुरावा बनतो. अशा प्रकारच्या कारवाईची गरज पडेल तेव्हा ई साहित्य प्रतिष्ठान आपल्याकडचा सर्व पुरावा लेखकांच्या मदतीला देईल. मात्र अशा कारवाईत ई साहित्य प्रतिष्ठान पार्टी रहाणार नाही.

ई साहित्यने प्रकाशित केलेल्या पुस्तकावर ई साहित्यचा कॉपीराइट असतो. तो फ़क्त ईसाहित्यने प्रकाशित केलेल्या आवृत्तीपुरताच असतो. ई साहित्यने प्रकाशित केलेली आवृत्ती पोर्टलवर ठेवण्याचे वा न ठेवण्याचे हक्क ई साहित्यकडे असतात.

a

पुर्वप्रकाशित पुस्तक: **जर आपले पुस्तक यापुर्वी दुसऱ्या प्रकाशकाकडून प्रकाशित झालेले असेल** तर ई साहित्य वरून पुनःप्रकाशित करण्यापुर्वी आधीच्या प्रकाशकाची NOC लागेल. एकाच वेळी एक पुस्तक एकाहून अधिक प्रकाशकांकडून प्रकाशित करणे हा गुन्हा नसला तरी नैतिकतेनुसार अयोग्य असते.

या पुर्वी प्रकाशित झालेल्या पुस्तकाचे ई साहित्यतर्फे पुनःप्रकाशन किंवा पुर्वप्रकाशित छापील पुस्तकाचे ई पुस्तक करायचे असल्यास: आपले पुस्तक यापुर्वीच दुसऱ्या प्रकाशकाने प्रकाशित केलेले असल्यास पुस्तकाच्या सॉफ़्ट कॉपीबरोबरच आधीच्या प्रकाशकाचे ना हरकत पत्र (NOC) आवश्यक आहे. हा नियम इतर वेबसाइटवर प्रकाशित झालेल्या पुस्तकांनाही लागू होतो. अशी सुस्पष्ट शब्दांतली लेखी NOC नसेल तर ईसाहित्य पुस्तक प्रकाशित करत नाही. लेखकांनी अशी माहिती लपवून ठेवल्यास ती त्यांच्या कायदेशीर अंगलट येऊ शकते. मात्र ब्लॉग किंवा फ़ेसबुक इत्यादिवरील स्वतःच्या साहित्यासाठी कोणाच्याही परवानगीची गरज नाही.

a

ई साहित्यवर प्रकाशित पुस्तक नंतर पुनःप्रकाशनासाठी दुसऱ्या प्रकाशकाकडे देता येते का?

ई साहित्यने बनवलेल्या/वितरित केलेल्या ई पुस्तकावर ई साहित्यचा हक्क असतो. लेखकाला आपले पुस्तक दुसऱ्या प्रकाशकाकडून पुनःप्रकाशित करायचे असल्यास त्याने ई साहित्यला तसे कळवणे नैतिकदृष्ट्या अपेक्षित आहे(कायद्याने बंधनकारक नाही). तसेच ई साहित्यने प्रकाशित केलेले पुस्तक जसेच्या तसे इतर प्रकाशनांसाठी वापरणे अनुचित ठरेल. यातील **कोणत्याही परिस्थितीत एकदा ई साहित्यवर प्रकाशित झालेले पुस्तक साइटवरून काढण्याची विनंती स्विकारली जाणार नाही**. तसेही एकदा प्रकाशित झालेले ईपुस्तक सुटलेल्या बाणाप्रमाणेच असते. ते मागे घेता येत नाही.

a

ई साहित्यच्या कार्यपद्धतीबद्दल : आपल्या साहित्याचे प्रकाशन होण्यापुर्वी www.esahity.com वर नजर टाकावी ही विनंती. ई साहित्य प्रतिष्ठानची संपूर्ण माहिती चित्रांसह मिळेल. त्यामुळे ई साहित्यने प्रकाशित केलेली पुस्तके असंख्य ठिकाणी दिसतात. कधीकधी कोणी या पुस्तकांचा वापर स्वतःच्या आर्थिक फ़ायद्यासाठीही करतात असे आम्हाला कळले आहे. अगदी ई साहित्यने प्रकाशित केलेली पुस्तके काही लोक लेखकाला किंवा ई साहित्यला न विचारता परस्पर विकतात असेही कळले. तसेच यातील एखादे पुस्तक लेखकाचे नाव बदलून स्वतःच्या नावाने करणे अगदी सहज सोपे आहे. इंटरनेट हे दुधारी शस्त्र आहे. त्याचे जेवढे फ़ायदे तेवढेच तोटेही आहेत. याची कल्पना आपल्याला असावी.

a

छापील पुस्तक- ई साहित्यवर प्रकाशित पुस्तक छापिल स्वरुपात हवे असल्यास: नवीन तंत्रज्ञानाने POD- Print on Demand- तुम्ही आता स्वतःचे पुस्तक स्वखर्चाने हव्या तितक्या प्रती (अगदी १०-२० सुद्धा) छापून घेऊ शकता. जवळपास सर्व प्रमुख शहरांत हे तंत्र उपलब्ध आहे. यासाठी ई साहित्यला माहिती देणे ईष्ट ठरेल. तसे ठरवल्यास ई साहित्यकडून एक वेगळी कमी पेजेसची PDF file for printing मिळेल. त्यासाठी वेगळा वेळ लागेल. पण ई साहित्य त्याचे पैसे घेत नाही.

ई साहित्य प्रतिष्ठानने तयार व प्रकाशित केलेले पुस्तक तुम्ही कुठेही छापून घेऊ शकता. इतर पर्याय नसेल तर ई साहित्यच्या मदतीने प्रिंटिंग करून मिळेल. शंभर पानी पुस्तक वीस प्रतींचे दोन हजाराहून कमी खर्च येईल. (वाहतूक खर्च अंतरानुसार वेगवेगळा) प्रतींची संख्या वाढल्यास खर्च प्रमाण कमी होईल.(उदा. ५० प्रती ४०००/-) पानांची संख्या वाढल्यास किंमतही त्या प्रमाणात वाढेल. कव्हर सोडून बाकी सर्व काळ्या शाईचे असेल. कव्हर कार्ड पेपरचे रंगीत असेल.

या पुस्तकावर जरी प्रकाशक म्हणून ई साहित्यचे नाव असले तरी त्यात ई साहित्यचा आर्थिक वाटा (लाभ वा नुकसान) नसेल.

१०० टक्के रक्कम लेखकाकडेच जाईल.

अनुवाद: इतर भाषांतील पुस्तकांचा अनुवाद करण्यापुर्वी त्या त्या लेखक कवींची लेखी अनुमती आवश्यक आहे. भारतीय कायद्यांनुसार (Copyright acts) जर लेखक कवीचे निधन होऊन ६० वर्षे लोटली असतील तर अशा अनुमतीची गरज नाही. परंतु ई पुस्तक आंतरराष्ट्रीय प्रकाशन असल्यामुळे त्या त्या देशांतील कायद्यांचा अभ्यास करून निर्णय घ्यावा.

ISBN : आजवर ई साहित्यच्या पुस्तकांवर ISBN नव्हता व नसतो. भविष्यकाळात तो घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. संस्थात्मक ISBN मिळणे अवघड असले तरी लेखकाला दोन आठवड्यात विनामूल्य ISBN मिळतो. त्यासाठी आपण ISBN साठी अर्ज करू सकता. अनेकांना एका आठवड्यातच मिळून जात आहे. Raja Rammohun Roy National Agency for ISBN. https://isbn.gov.in/ या लिंकवर जाऊन आपल्या पुस्तकाची माहिती दिल्यावर आपल्याला ISBN क्रमांक मिळेल.

ePub : ई साहित्यची काही पुस्तके ई पब मध्ये उपलब्ध आहेत व लवकरच यांत वाढ होईल.

a

आपण आपले पुस्तक ई साहित्य प्रतिष्ठानतर्फे प्रकाशित करण्याचा निर्णय घेतल्यास आम्हाला आनंदच होईल. कृपया लवकरात लवकर आपल्या **पुस्तकाची सॉफ़्ट कॉपी (Word file) कव्हरसह पाठवावी. मराठी युनिकोड** (मंगल, एरिअल युनिकोड, कोकिळ, निर्मला, उत्साह इत्यादी) फ़ॉंट असावा. (फ़ेसबुक, ईमेल, Whatsapp वर चालणारे Fonts Unicode असतात) साहित्य पाठवण्यापुर्वी त्याचे शुद्धलेखन वगैरे व्यवस्थित तपासून पाठवावे. शक्यतो व्यावसायिक प्रुफ़रिडरची मदत घ्यावी. याबाबत काही मदत लागल्यास निःसंकोच कळवा. शुद्धलेखनाच्या चुका असल्यास पुस्तक प्रकाशित होत नाही. तसेच एकदा पुस्तक तयार झाल्यावर चुका दुरुस्त होणार नाहीत. लेखकाने स्वतः मुखपृष्ठ व पुस्तकाचे ले-आउट बनवावे अशी अपेक्षा आहे. ज्या लेखकांना शक्य असेल त्यांनी संपूर्ण पुस्तकच बनवून द्यावे, व ई साहित्यकडे फ़क्त वितरणाचे काम ठेवावे. ज्यांना हे शक्य नसेल त्यांना लागेल ती मदत ई साहित्य यथाशक्ती पुरवील. काही वेळा याचा खर्च लेखकाला उचलावा लागेल.

आपले साहित्य पाठवल्यावर ते वेगवेगळ्या संपादकांकडे पाठवले जाते. प्रकाशनाची तारीख व इतर डिटेल लवकरच

a
कळवले जातात. **आठवडाभरातच कन्फ़र्मेशन (हो किंवा नाही) कळवले जाते. पुस्तक प्रकाशन त्यानंतर ३० दिवसांत केले जाते**. प्रकाशन होणार नसल्यास त्याचे कारण दिले जाईलच असे नाही. पुस्तक बनत जाईल तसतसे ते लेखकाच्या अप्रुव्हलसाठी पाठवले जाईल.

आपण आमच्याबरोबर काम करावं अशी आमची इच्छा, आग्रह राहील. केवळ साहित्य पाठवून नव्हे तर आमच्यातले एक बनून. आपलं अगदी मनापासून स्वागत आहे. मात्र केवळ मोफत प्रकाशन आणि वितरण होतं या मोहापायी ई साहित्यकडे वळू नये. पूर्ण अटी वाचून व भविष्याचा पूर्ण विचार करूनच तसेच या क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तींचा सल्ला घेऊनच हा पर्याय निवडावा हा सावधगिरीचा इशाराही आम्ही देऊ इच्छितो.

a

ई साहित्यवर प्रकाशनाचे फ़ायदे

१)ई पुस्तक भिजत नाही, जळत नाही, वाळवी नाही. ते कधीही नष्ट होत नाही

२)ई पुस्तकाच्या वितरणाचा सर्व खर्च ई साहित्य प्रतिष्ठान स्वतःच करते.

३)ई पुस्तक लाखो लोकांपर्यंत जाते. ते कायम फ़िरत रहाते. जगातील सर्व देशांत आणि भारतातील सर्व राज्यांत, महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांत ते विजेच्या वेगाने जाते.

४)ई पुस्तकाचे एडिटिंग छापिल पुस्तकाहून सोपे असते. पण एकदा डाऊनलोड झालेले पुस्तक मात्र परत येऊ शकत नाही.

५)ई पुस्तकात तांत्रिक क्षेत्रातले बदल अंतर्भूत होत असतात. हे खूप मोठे आहेत. उद्याचे जग ई पुस्तकांचेच असेल. त्यात बोलणारी पुस्तके, मल्टिमिडिया पुस्तके, शब्दार्थ सांगणारी पुस्तके, संदर्भ सांगणारी पुस्तके, व्हिडिओ ऑडिओ पुस्तके असे अनेक प्रकार येतील. **एआय नंतर वाचनाचे अनुभव आमुलाग्र बदलणार आहेत. त्यांना केवळ ई पुस्तकेच उपयोगी पडतील**.

a

इंटरनेटवर प्रकाशनाचे तोटे:

१)ई पुस्तक नष्ट होत नाही. त्यामुळे ते एकदा ई साहित्यवर गेले की कायम रहाते. काढता येत नाही.

२)ई पुस्तक बाणासारखे किंवा पत्रासारखे असते. एकदा सुटले की परत जमा करता येत नाही. चूक राहून गेली तर ती मागे घेता येत नाही. विशेषतः कायदेशीर चुका टाळाव्या.

३)ई-पुस्तक लेखकाचे नाव बदलून स्वतःच्या नावाने करणे अगदी सहज सोपे आहे.

४)ई पुस्तक लेखकाला व प्रकाशकाला न कळवता परस्पर विकणे सोपे असते. असे घडतेही.

(हे ई पुस्तकांचे तोटे केवळ ई पुस्तकांपुरते मर्यादित नाहीत. छापिल पुस्तकांत सुद्धा या सर्व गोष्टी लागू पडतात)

ई साहित्यवर प्रत्येक प्रकारची एक किंवा दोन पुस्तके दरमहा प्रकाशित होता. एक किंवा दोन कथासंग्रह, कादंबरी, अध्यात्मिक, प्रवासवर्णन, कवितासंग्रह, विनोद, ललित, चरित्र, इतिहास, बालसाहित्य इत्यादी.

विशेषतः कवितासंग्रहाच्या बाबत : ई साहित्यवर दरमहा एक कवितासंग्रह प्रकाशित होतो. प्रकाशनासाठी अनेकदा दहाहून अधिक संग्रह येतात. त्यामुळे नाइलाजाने काही संग्रह दर्जेदार असूनही करता येत नाहीत. त्याने नाउमेद होऊ नये. त्यासाठी कारण देणे शक्य नसते.

https://youtu.be/54vJJmicvgE

ई साहित्यच्या प्रकाशनपद्धतीचा व्हिडिओ वर दिलेला आहे.

अधिक माहितीसाठी www.esahity.com ला भेट द्यावी. काही प्रश्न असल्यास याच मेलवर विचारावे. शक्यतो सर्व व्यवहार मेलवर लेखी करावेत. तोंडी, फ़ोनवर व्यवहार टाळावे. शब्दप्रभू लेखकाला तर सर्व लेखीच करता आले पाहिजे. तरीही काही प्रश्न राहिलेच तर फ़ोन करू शकता. प्रत्यक्ष भेटीची गरज नाही.

कृपया आपले साहित्य वर्ड फ़ाईलच्या स्वरुपात esahity@gmail.com ला पाठवावे ही विनंती.

आपण केवळ लेखन पाठवून नव्हे तर ई साहित्य चळवळीचा एक भाग म्हणून काम करावे असे आवाहन आम्ही तुम्हाला करत आहोत.

शुभेच्छांसह.

सुनीळ सामंत	आनंद माने
अध्यक्ष	सचीव

ई साहित्य प्रतिष्ठान

एक प्रसन्न अनुभव